# प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.११.०४.२०२२

**आलोसे श्री.गोपाळ कडु चौधरी, वय–५५, व्यवसाय–नोकरी, शिपाई, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव ता.जि.जळगांव रा.जुना खेडी रोड, डी.एन.सी.कॉलेज जवळ, जळगांव ता.जि.जळगांव मुळ रा.पाडळसा ता.यावल जि. जळगांव यांना ३०,०००/–रु. लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग, जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | :– | जिल्हापेठ पो.स्टे. गु.र.नं. ०२६७/२०२२ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | श्री.गोपाळ कडु चौधरी, वय–५५, व्यवसाय–नोकरी, शिपाई, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव ता.जि.जळगांव रा.जुना खेडी रोड, डी.एन.सी.कॉलेज जवळ, जळगांव ता.जि.जळगांव मुळ रा.पाडळसा ता. यावल जि.जळगांव (उर्जा व कामगार विभाग, वर्ग–४) |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.११/०४/२०२२<br>प्रथम २,२५,०००/–रु. व लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,१०,०००/– रु.लाचेची मागणी केली व तीन टप्प्यांपैकी पहिला टप्पा ३०,०००/–रु. स्वीकारले. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ३०,०००/–रु. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.११/०४/२०२२ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील तक्रारदार यांनी दि.३०/०३/२०२२ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,जळगांव येथे मा.जळगांव माथाडी व असरंक्षित कामगार मंडळ,जळगांव यांचे नावे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळणेसाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी अर्ज सादर केला होता. दि.३०/०३/२०२२ रोजी तक्रारदार यांनी शिपाई गोपाळ चौधरी यांची भेट घेतली तेव्हा शिपाई श्री.गोपाळ चौधरी यांनी माझे वरिष्ठ अधिकारी यांचेशी माझे चांगले संबंध आहेत. मी कोणतेही काम आमचे वरीष्ठ अधिकारी यांचे कडे घेवुन गेलो तर ते लगेच करुन देतात. यापुर्वी मी बऱ्याच मुलांचे काम करुन दिलेले आहेत.तुझ्यासारखे अनेक मुलांनी सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळणेसाठी अर्ज सारद केलेले आहेत.जर तुला सिक्युरिटी गार्डची नोकरी हवी असेल तर मी तुला वरिष्ठांकडुन सिक्युरिटी गार्डची नोकरी मिळवुन देतो. त्यासाठी तुला २,२५,०००/–रुपये मला द्यावे लागतील असे सांगुन तडजोडीअंती २,१०,०००/–रु.लाच रकमेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.११/०४/२०२२ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.११.०४.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी तक्रारदार यांना जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळवुन देण्याच्या मोबदल्यात प्रथम २,२५,०००/–रु. व तडजोडीअंती २,१०,०००/–रु. लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन ३०,०००/–रु.लाचेची रक्कम आरोपी यांनी स्वतः वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** १०६४

**दुरध्वनी क्रमांक:–** ०२५७–२२३५४७७

**व्हॉटस्अ‍ॅप क्रमांक:–** ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

12.4.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**